# D.A.V. Public School, New Panvel

**October 2020**

**12th October to 21st October**

**Std. VI to VIII - I Term/ II Periodic**

**Std. IX and X - II Periodic Test**

**19th October to 24th October**

**Std. III to V - II Unit Test**

## Monthly Activities

**Nursery to Sr. K.G.** - Gandhi Jayanti related activities, Navratri Celebration

**Std. I and II** – Slogan writing, Fancy dress and Navratri Celebration

**Std. III** – Elocution Competition

**Std. IV** – Elocution Competition

**Std. V** - Extempore Competition

**Std. VI** – Poster Making Competition

**Std. VII** – Declamation

**Std. VIII** – Rangoli Making

**Std. IX and X** – Ekta Diwas Competition

**Std. XI and XII** – Food Fest
















**15th October**
**International Hand wash Day**
**Students**

Dedicated to increasing awareness and understanding about the importance of handwashing and to motivate and mobilize people around the world to improve their handwashing habits, various activities were conducted by the students on this day like Poster making, slogan writing, tips and importance of hand wash etc







**29th October**

**Vigilance Awareness Week (VAM) 2020**

The central Vigilance Commission observed the Vigilance Awareness Week to encourage the fight against corruption. It was observed by the **teachers, other staff and students from Std. VI to XII** by taking the **e- integrity Pledge** on the official portal of Vigilance Commission website.

The theme was Satark Bharat, Samriddh Bharat (Vigilant India, Prosperous India








31st October

## Rashtriya Ekta Divas

The day is celebrated to mark the birth anniversary of Sardar Vallabhai Patel.

**Several activities were conducted on this occasion.**

- **III to V -- Poster Making on Rashtriya Ekta**
- **VI to VIII – Slogan Writing on Rashtriya Ekta**
- **IX and X – Debate Competition on Sardar Vallabhai Patel**
- **XI and XII Eassy Writing on Sardar Vallabhai Patel**












---



Ms. Rupali Rane
Pre-Primary Section

## "माणुसकीने करुया करोना वर मात"

लिहिण्यासाठी हात धजावत नाहीत. मनात भीती वाटते कि या वहीला स्पर्श केला तर कोरोना तर होणार नाही ना? पण जे काही मनात वाटते ते कागदावर उमटलं नाही तर स्वस्थ बसता येणार नाही. होय कोरोcना बद्दलच लिहितेय, सतत जागता झोपता

ध्यानी- मनी स्वप्नी ,जळी स्थळी सर्व ठिकाणी या कोरोना वायरस ने संपूर्ण विश्वाच्या मनात भीती निर्माण केलीय. दूरदर्शन, व्हॉट्सॲप, एफबी या प्रसारमाध्यमांनी न थांबता कोरोना चे व्हिडिओ प्रसारित करून जनमानसात कोविड 19 आजाराबद्दल जागरुकता निर्माण तर केली पण त्यामुळे संपूर्ण जगाचा या रोगामुळे थरकाप उडाला. प्रसारमाध्यमं तर त्यांची काम करतायेत त्यामुळेच तर या असाधारण रोगाची माहिती, त्याची लक्षणं सर्वांना समजली. 2020 च्या आरंभाला जानेवारीत चीनचे भयानक व्हिडिओ सर्व मोबाईल, दूरदर्शन, रेडिओ वर फिरू लागले, काही गोष्टी अतीरंजक पद्धतीने दाखवल्या गेल्यामुळे प्रथमतः जनमानसात माहिती पसरली पण तोपर्यंत भीतीने जागा घेतली नव्हती ;पण जेव्हा मार्चच्या सुरुवातीला भारतामध्ये हा कोरोना दाखल झाला तेव्हा मात्र भारतीयांमध्ये भीतीचे सावट पसरू लागले. सुरुवातीला एक मग दोन मग बघता बघता शंभरच्यावर आकडा जेव्हा गेला तेव्हा मग ही परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागलीय असं वाटू लागलं. त्यातच देशाने 22 मार्चला कर्फ्यू चा निर्णय घेतला तेव्हा कुठे भारतीयांना जाणवले की खरंच हा रोग साधा नाही याच नियंत्रण होत नाहीय. ज्याप्रमाणे राजा मिडास ची हाव वाढली आणि त्याने प्रत्येक वस्तूला स्पर्श केला तर ती सोन्याची झाली तसाच हा कोरोना ज्याला स्पर्श करेल त्याला होतोय. कोरोनाची साथ जगभरात वाढत चाललीये.

पूर्ण जगभरात covid-19 ने थैमान मांडले. या रोगावर उपायही नाही. बस फक्त घरात शांत बसणे हा उपाय.खरच! कुठेतरी थांबणे आवश्यक झालं होतं. माणूस स्वतःच्या हव्यासापोटी नुसता पळत होता स्वतःच्या कुटुंबाची पोटाची खळगी भरण्यासाठी सतत स्पर्धेत धावत होता. पण या कोरोना ने त्याला थांबवल. आता सध्या आपण अश्मयुगीन काळात आहोत असा भास होऊ लागलाय. जीवनावश्यक गोष्टी आणण्यास जीव धोक्यात घालून बाहेर पडायचं आणि पुन्हा विजय मिळवलयाप्रमाणे वस्तू घेऊन घरी परतायच .असं शांत आदर्श जीवन प्रत्येकालाच हवं होतं ना ?प्रगतीच्या वाटेवर मार्गक्रमण करता करता आपण माणूस आहोत हेच विसरलो होतो. वाढत्या स्पर्धेत स्वतःचं अस्तित्व अबाधित ठेवून यशाचे शिखर गाठण्याचा रस्सीखेचमधये आपणास घर ,कुटुंब आहे. हेच विसरून गेलो होतो. कोरोना नामक राक्षसाने प्रत्येकाला घरी बसवल. आपण आपल्या कुटुंबाला वेळ देऊ लागलोय, आपण घरी असल्यामुळे रस्ते शांत झालेत.वृक्ष, नदया, पशुपक्षी, पर्वत पठारे, ही माती जिवंत असल्याचा अनुभव घेऊ लागलीय.कधी नव्हे ते पशुपक्षी या धरणीवर मुक्त संचार करू लागलेत.

आपल्या अवाजवी मागण्या पूर्ण करण्यासाठी माणूस निसर्गासोबत खेळत होता. खरंच !कोरोना दानव की आपण राक्षस झालो होतो. आता कोठे वसुंधरा श्वास घेऊ लागलीय.पण ही अशी वेळ येण्यासाठी कोरोना नामक दानव येण्याची काय आवश्यकता होती? प्रत्येक जण पर्यावरणानुकूल वागले असते तर ही अशी जीवघेणी वेळ आली नसती. आधुनिक जीवनशैली जरी आपल्याला आकर्षक वाटत असली

तरी निसर्गा मुळेच आपण आहोत. वेळ आली तर ती कवेत घेते आणि मानवाच्या चुकांच्या पापांचा घडा भरला तर संपूर्ण जगाचा संहार करण्याची ताकद ही सर्वस्वी निसर्गालाच आहे,हे विसरुन चालणार नाही. स्वतःचा विवेक वापरून काय योग्य व काय अयोग्य आहे. हे जाणून आपण प्रत्येक पाऊल उचलायला हवं, नाहीतर कोरोना  भस्मासुरा सारखी अनेक दैत्य आपणास त्रास देण्यास येतील .लॉक डाऊन मध्ये जरी शांत बसलोय तरी माणूस किती काळ घरी बसून राहील ,उपजीविका भागविण्यासाठी घराबाहेर पडावे लागेलच. पण  आता घराबाहेर पडताना माणसाने स्वतःमध्ये पूर्णतः  बदल घडवणे आवश्यक ठरणार आहे. आपली वागणूक निसर्गाला मारक न ठरता ती पूरक असावी, हे सतत मनावर बिंबवणे व तशीच कृती करणे महत्त्वाचे ठरणार आहे.निसर्ग मित्र होऊन पर्यावरण संतुलन राखणारे हात बणुन माणसातला माणूस जिवंत करणे खऱ्या माणुसकीच  लक्षण ठरणार आहे. सद्य परिस्थितीत घरी थांबून हा covid-19 संपल्यावर प्रत्येक माणूस माणुसकीने वागेल हीच अपेक्षा आहे.